■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १९ ● अंक २ ● मंगळवार, दि. २ ते ९ जुन २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

# ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश : 'विकसित महाराष्ट्र' अंतर्गत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट

**मुंबई, दि. १ : 'विकसित महाराष्ट्र अंतर्गत' पर्यंत एसटी महामंडळामध्ये सन २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० टक्के; तर २०४७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत करायचा आहे. या अनुषंगाने बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**




मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ-बसेससंदर्भात बैठक झाली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उपसचिव चेतन निकम आदी या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पर्यावरणपूरक ई-बसेस ज्या मार्गावर चालवायच्या आहेत, त्या मार्गाचा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने अभ्यास करावा. पुरवठादाराकडून बस प्राप्त होताच त्या बसेसचे पुढील ७ दिवसात निरीक्षण करावे. या बसेसकरिता एक इकोसिस्टिम तयार करावी. ज्या मार्गाने खाजगी बसेस धावतात, त्या मार्गाचाही अभ्यास करून ई-बसेसचा पर्याय तयार ठेवावा.

राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई-बसेसचा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

या धोरणानुसार १,५०० ई-बसेसना बसच्या किमतीच्या १० टक्के किंवा कमाल २० लाख रुपये इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात पर्यावरणपूरक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करण्याच्या उद्देशाने हे धोरण महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सध्या जीसीसी मॉडेलवर ५,१५० ई-बसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील प्रवाशांना आधुनिक, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## १ लाख ४७ हजारांचे ९ हरवलेले मोबाईल शोधून मूळ मालकांना केले परत



**रिसोड :** शहरी आणि ग्रामीण भागातून हरविलेले किंवा चोरीला गेलेले मोबाईल फोन शोधण्यासाठी रिसोड पोलिसांनी राबवलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश आले आहे. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे तब्बल १ लाख ४७ हजार रुपये किमतीचे ०९ महागडे मोबाईल फोन शोधून काढले असून, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ते मूळ मालकांना सुपूर्द केले आहेत. आपला गमावलेला फोन परत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू पाहायला मिळाले.

रिसोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोबाईल चोरीस गेल्याच्या आणि हरविल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांनी दाखल केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली. आधुनिक पोर्टल आणि सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने पोलिसांनी या मोबाईल फोनचा माग काढला. यशस्वी तपासानंतर संबंधित मोबाईल धारकांशी संपर्क साधून पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले आणि त्यांचे फोन त्यांच्या स्वाधीन करण्यात आले.

नागरिकांनी मानले पोलिसांचे आभार अनेक महिन्यांपूर्वी हरवलेला मोबाईल पुन्हा मिळेल अशी आशा सोडून दिलेल्या नागरिकांना जेव्हा पोलिसांचा फोन आला, तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. सदरची कामगिरी वाशिमचे पोलीस अधीक्षक . निकेश खाटमोडे-पाटील , अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार रवि इरतकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली. वि.प्र.

## सोयाबीन व हळद पिकावर कृषी चर्चासत्र कार्यशाळा



रिसोड :-कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम कृषी माहिती तंत्रज्ञान व निविष्ठा पुरवठा केंद्रा अंतर्गत दिनांक २७ मे २०२६ रोजी मौजे बिटोडा भोयर तालुका वाशिम येथे सोयाबीन व हळद पिकावर शेतकरी बंधू करिता एक दिवसीय कृषी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले या कृषी चर्चा सत्रासाठी कृषी विज्ञान केंद्र करडा येथील कीटक शास्त्रज्ञ तथा तांत्रिक समन्वयक कृषी महाविद्यालय रिसोड राजेश डवरे यांची तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली इतर उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये मदन सरनाईक तांत्रिक सहाय्यक जैविक कीड व्यवस्थापन प्रयोगशाळा कृषी विज्ञान केंद्र करडा व एस एम बोधडे संपर्क प्रमुख कृषी तंत्रज्ञान माहिती व निविष्ठापुरठा केंद्र कृषी विज्ञान केंद्र करडा हे उपस्थित होते या चर्चासत्राच्या तांत्रिक सेशन मध्ये राजेश डवरे यांनी सोयाबीन व हळद पिकाच्या अधिक उत्पादनाकरिता महत्त्वाच्या टिप्स देताना लागवडीची अद्यावत पद्धत, सुधारित वाण, जैविक व सेंद्रिय खताचा अंतर्भाव करून वापरावयाची एकात्मिक अन्नद्रव्यव्यवस्थापन पद्धत बीज प्रक्रिया व बेणे प्रक्रिया एकात्मिक तन तसेच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याविषयी विस्तृत सादरीकरण केले व सादरीकरणाच्या शेवटी शेतकरी बंधूंना सोयाबीन व हळद पिकामध्ये जैविक निविष्ठाची बीज प्रक्रिया व बेणे प्रक्रिया कृती प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखवली तसेच शेतकरी बंधूंनी विचारलेल्या विविध शंकांचे निरसन केले याप्रसंगी मदन सरनाईक व एस एम बोधडे यांनी सुद्धा महत्त्वाच्या खरीप पिकावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदन सरनाईक यांनी तर आभार प्रदर्शन बोधडे यांनी केले या चर्चासत्राच्या यशस्वी आयोजनासाठी मौजे बिटोडा भोयर येथील शेतकरी योगीराज मस्के राजू पडघान प्रभाकरजी भोयर यांच्यासह संपूर्ण गावकरी मंडळींनी अथक परिश्रम घेतले( वि. प्र )

## फिश वेंडिंग ई-रिक्षा योजनेमुळे मत्स्यविक्रीला नवे बळ

मुंबई, दि. २६ : राज्यातील मत्स्यविक्री व्यवसाय अधिक स्वच्छ, आधुनिक आणि ग्राहकाभिमुख करण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत फिश वेंडिंग ई-रिक्षा मॉडेल राबविण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर करावा, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक विचार सुरू असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज येथे दिली.

मंत्रालयात मत्स्यव्यवसाय विभागाच्या फिश वेंडिंग स्टॉल योजने अंतर्गत लाभार्थ्यांना ९०टक्के अनुदान देणेबाबत व ई- रिक्षा आधारीत मॉडेल राबविण्यासंदर्भात आयोजित बैठकीत श्री राणे बोलत होते. यावेळी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

श्री राणे म्हणाले की, अमरावती जिल्ह्यात सध्या ८० नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत असून, त्यामधील अंदाजे ५०० ते ७०० सक्रिय सभासद किरकोळ मासळी विक्री व्यवसायाशी जोडलेले आहेत.

मात्र, जिल्ह्यातील बहुतांश मत्स्यविक्री बाजारपेठा अस्वच्छ आणि अपुऱ्या सुविधांनी ग्रस्त आहेत. यामुळे मासळीच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून मच्छीमारांना योग्य बाजारभाव मिळण्यात अडचणी येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाने फिश वेंडिंग ई-रिक्षा हे आधुनिक मॉडेल राबविण्याचा प्रस्ताव सादर करावा. विभागामार्फत आणि जिल्हा वार्षिक योजनेतून मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल.या योजनेसाठी प्रति लाभार्थी अंदाजे ४ लाख रुपयांचा प्रकल्प खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे.

# स्वत: त्याग केला तरच त्याला अर्थ आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला काटकसरीचे आवाहन केल्यानंतर उलटसुलट प्रतिक्रिया विविध माध्यमांतून उमटत आहेत. सोने खरेदीला फाटा, पेट्रोल डिझेलचा कमी वापर, याचा परिणाम अखेर महागाई आणि बेरोजगारी वाढण्यात होणार असा एकूण सूर आहे. सरकार जेव्हा आर्थिक संकटातून जात असते तेव्हा जनतेला काटकसरीचे आवाहन केले जाते. रुपयाची आंतराष्ट्रीय बाजारात काय किंमत आहे हे सर्वांना ठाऊक आहे आणि बाहेर व्यवहार अमेरिकन डॉलर्समधून होत असल्याने भारताला ते जड जातेय. गेले दोन महिने होर्मुझची सामुद्रधुनी बंद आहे. कितीही नाही म्हटले तरी याचा परिणाम तेल व नैसर्गिक वायू पुरवठा यावर झालाच आहे. शिवाय भारतीय वस्तूंच्या निर्यातीवरही झाला आहे. एकूण काय तर परकीय चलनाद्वारे कमीत कमी खरेदी व्हावी व देशाच्या गरजा मर्यादित ठेवाव्या हा त्याचा अर्थ. बचत करा म्हणजेच टंचाईला तोंड द्या. शासकीय भाषेत दुष्काळाला टंचाई हा शब्द आहे. पाण्याची टंचाई, अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली की हा शब्द वापरला जातो. वेगळ्या मागनि जनतेला सामील करून घेत सर्व गोष्टींचे रेशनींग सुरू होणे याचाच दुसरा अर्थ टंचाई परिस्थितीला सामोरे जाणे असा होतो. काटकसरीचे आवाहन फक्त सामान्य जनता व शेतकरी वर्गालाच का, असा एक सवाल प्रामुख्याने केला जात आहे. आज शेतकरी अडचणीत आहे व तो वेगवेगळ्या समस्यांचा सामना करत आहे. उत्पादन खर्चही निघत नाही तेव्हा नफ्याचे गणित जुळता जुळत नाही. शेतीला उत्तम जोडधंदा म्हणून ओळखला जाणारा दुधाचा व्यवसाय अडचणीत आहे. शेतकरीवर्गाच्या मते दुधाचा उत्पादनखर्च लिटरमागे ५० रुपये असताना बाजारात ३६ ते ४१ रुपये दर मिळतो. परवा एका कांदा उत्पादक शेतकऱ्याला अवघ्या एक रुपया किलो दराने कांदे विकावे लागल्याचे वृत्त आले. शेतकरीवर्गाने रासायनिक खतांचा वापर कमी करावा अशी अपेक्षा पंतप्रधान व्यक्त करतात. पण सेंद्रीय खत वापर, सौरऊर्जा निर्मिती याला फारसे पोषक वातावरण व प्रोत्साहन दिसत नाही. सेंद्रीय खतांसाठी फारसे काही करताना दिसत रासायनिक खतांसाठी अनुदान देणारे केंद्र सरकार नाही. सेंद्रीय उत्पादने वाढवणे ही काळाची गरज असतानाही त्यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती नाही. देशी तेलबिया उत्पादन वाढावे व त्याला उत्तम भाव मिळावा अशी अपेक्षा असताना विदेशातून तेल आयातीवर नियंत्रण न आणता आता परकीय चलन वाचवण्यासाठी याचा वापरच कमी करा असे आवाहन केल्याने लोक बुचकळ्यात पडले आहेत हे वास्तव आहे. देशापुढे अडचणी येतात तेव्हा पोटाला चिमटा घेऊन कनिष्ट मध्यमवर्ग व शेतकरीच ढाल बनतो. त्याच्या तक्रारी व गाऱ्हाण्यांना आवाज नसतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी होते तेव्हा सर्वसामान्यांना दिलासा मिळाला नव्हता. कार्पोरेट टॅक्समध्ये कपात केली गेली तेव्हा वेगळीच भाषा होती. देशापुढे अडचणी आल्या की मध्यमवर्ग, शेतकरी, बेरोजगार, गृहिणी यांनाच त्याची तोशीस सहन करावी लागते. जेव्हा बँकांची काही लाख कोटींची थकित कर्जे निर्लेखित केली जातात, कार्पोरेट टॅक्समध्ये कपात केली जाते तेव्हा हाच वर्ग आपण यात कुठे आहोत का, हे शोधत असल्याची भाषा विविध प्रतिक्रियांमधून ऐकायला मिळत आहे.

# लेहणी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी

**रिसोड /नाजीम खान**

रिसोड:तालुक्यातील लेहणी येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील धनगर समाज बांधव, महिला भगिनी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व पूजन करून करण्यात आली. त्यानंतर ''येळकोट येळकोट जय मल्हार'', ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर की जय'' अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी ह.भ.प. लक्ष्मण महाराज देवकर, वसंता हुले, केशव हुले, भागवत हुले, राजू पातळे, भगवान हुले (यशवंत संघर्ष सेना तालुका अध्यक्ष), रामेश्वर हुले, नागेश हुले, अमोल नव्हाळे, नारायण हुले, रामदास खणपटे, संतोष पातळे, डॉ. ज्ञानेश्वर टोंचर (अध्यक्ष, धनगर समाज लेहणी), समाधान हुले, पवन हुले, डिगांबर गावंडे, कैलास हुले, गणेश जामकर, महादेव हुले, प्रभु गावंडे, विष्णु हुले, सिद्धेश्वर हुले, घनश्याम हुले, गजानन टाकसाळ, दत्ता टोंचर, कुणाल टोंचर, विशाल टोंचर, विठ्ठल हुले, पुरुषोत्तम हुले, दत्ता हुले, सार्थक हुले, अभिषेक हुले, शुभम हुले, संदीप हुले, तुकाराम बोडखे, अर्जुन गावंडे, वैभव शेळके, ज्ञानेश्वर गावंडे, संकेत छत्रे, अंकुश गायकवाड, राजू गायकवाड, योगेश गायकवाड यांच्यासह समस्त गावकरी उपस्थित होते.

यावेळी बोलताना यशवंत संघर्ष सेना तालुका अध्यक्ष भगवान हुले म्हणाले की, ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे समाजसेवा, न्यायनिष्ठा आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजातील युवकांनी शिक्षण, संघटन आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अशा महापुरुषांच्या जयंतीमुळे नव्या पिढीला इतिहासाची आणि समाजकारणाची प्रेरणा मिळते. ''कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले. उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात जयंती सोहळा संपन्न झाला.

# उन्हाळ्यातही घराघरांत मातीच्या माठाऐवजी फ्रिजला पसंती

## माठ संस्कृती लोप पावतेय

**मंगरुळपीर, दि. ३१ :** एकेकाळी प्रत्येक घराच्या अंगणात, ओट्यावर किंवा स्वयंपाकघरात मातीचा माठ हमखास दिसायचा. उन्हाळ्याच्या दिवसांत माठातील थंडगार आणि नैसर्गिक चवीचे पाणी पिण्याची मजा काही वेगळीच असायची. मात्र बदलती जीवनशैली, वाढते शहरीकरण आणि आधुनिक उपकरणांचा वाढता वापर यामुळे पारंपरिक माठ संस्कृती हळूहळू लोप पावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरांसह ग्रामीण भागातही आता माठाऐवजी फ्रिजला अधिक पसंती दिली जात आहे. पूर्वी उन्हाळा सुरू होताच कुंभार समाजातील कारागिरांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळत



असे. माठ, रांजण, सुरई आणि इतर मातीच्या भांड्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत होती. मात्र गेल्या काही वर्षांत माठांची मागणी लक्षणीयरीत्या घटल्याने कुंभारांचा पारंपरिक व्यवसाय संकटात सापडला आहे. वाढत्या खर्चाच्या तुलनेत विक्री कमी होत असल्याने अनेक कारागीर पर्यायी व्यवसायांकडे वळत आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या मते, माठातील पाणी शरीराला नैसर्गिक थंडावा देते आणि आरोग्यासाठीही लाभदायक असते. मातीच्या भांड्यातील पाणी शरीराच्या तापमानाशी संतुलित राहते. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, फ्रिजमधील अतिथंड पाण्यामुळे घसा, सर्दी आणि पचनासंबंधी त्रास होण्याची शक्यता असते. तरीही सोयीसुविधा, जलद थंड होणारे पाणी आणि अन्नपदार्थ साठवण्याची सुविधा यामुळे नागरिकांचा कल फ्रिजकडे वाढला आहे. उन्हाळ्यात फ्रिजच्या विक्रीत मोठी वाढ होत असून विविध कंपन्यांच्या सवलती, आकर्षक ऑफर्स आणि हप्त्यांच्या सुविधांमुळे ग्राहक खरेदीकडे वळत आहेत. मात्र पर्यावरणपूरक, आरोग्यदायी आणि भारतीय परंपरेचा भाग असलेल्या माठ संस्कृतीचे जतन होणे गरजेचे असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. अन्यथा भविष्यात माठ केवळ संग्रहालयात किंवा जुन्या छायाचित्रांमध्येच पाहायला मिळेल, अशी खंत अनेकांनी व्यक्त केली आहे.

# रिसोड शहरात वाढली आंब्याची आवक

**रिसोड :** उन्हाळयाची चाहूल लागताच बाजारपेठेत आंब्यांची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली असून रिसोड शहरातील फळबाजार विविध प्रकारच्या आंब्यांनी गजबजून गेला आहे. हापूस, केशर, लंगडा, बदामी, तोतापुरी, दशहरी आदी विविध जातींचे आंबे बाजारात दाखल होत असल्याने ग्राहकांचीही मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मात्र यंदा आंब्याच्या दरात मागील वर्षाच्या तुलनेत प्रतिकिलो सुमारे २० रुपयांची वाढ झाल्याचे चित्र आहे. वाहतूक खर्च, हवामानातील बदल तसेच उत्पादनात झालेली घट यामुळे दरवाढ झाल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले जात आहे. वाढत्या दरांनंतरही आंबाप्रेमींमध्ये खरेदीचा उत्साह कायम असल्याचे दिसून येत आहे. फळ विक्रेत्यांच्या माहितीनुसार, यंदा सुरुवातीपासूनच दर्जेदार आंब्यांना चांगली मागणी आहे. सकाळपासूनच बाजारात ग्राहकांची वर्दळ वाढत असून घरगुती वापरासह लग्नसमारंभव विविध कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात आंब्यांची खरेदी केली जात आहे. दरम्यान, उन्हाचा कडाका वाढत असताना रसाळ



आंब्यांकडे नागरिकांचा ओढा वाढला असून आगामी काही दिवसांत आवक आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. सदर आंब्याची आवक ही अन्य राज्यातून होत आहे मात्र आंब्यासाठी प्रसिद्ध असलेल्या हैदराबाद व अन्य ठिकाणी यावर्षी अवकाळी पाऊस वारा यामुळे आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. येणाऱ्या पुढील काही दिवसात आंब्याचे भाव वाढण्याची शक्यता आंब्याचे ठोक विक्रेत्यांकडून वर्तवली जात आहे. यावर्षी आंब्याची आवक चांगली असून भाववाढी मागे हैदराबाद व अन्य राज्यात झालेला अवकाळी पाऊस वादळ यामुळे आंब्याचे नुकसान झालेले आहे. सद्यस्थितीत आंब्याची चांगली मागणी असून खरेदी करण्यासाठी ग्राहकांचा मोठ्या प्रमाणात कल आहे. येणाऱ्या दिवसात काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. श.प्र.


# रिसोड येथे इद उल अज़हा उत्साहात साजरी



रिसोडः रिसोड शहरासह तालुक्यात इद उल अज़हा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आज २८ मे सोमवार सकाळी ८:३० वाजता शहरातील विविध भागातील मुस्लिम धर्मीय समाजातील बांधव जमा झाले व तेथून शाही इमाम अब्दुल दयार यांचे नेतृत्वात लोणी मार्ग स्थित इदगाहकडे रवाना झाले. तेथे सकाळी ८ : ४५ वा. शाही इमाम मो. दयार यांनी शहरातील एकत्रित झालेल्या सर्व मुस्लिम बांधवांना ईद ची नमाज पठण करवीली. नमाजनंतर देशात शांती नांदावी, भरपूर पाऊस पडावा ,देशात भाईचारा वाढावा, शेतकरी मजूर वर्ग सुखावा व व्यापारात समृद्धी यावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. नंतर सर्व मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देताना शुभेच्छा दिल्या व एकमेकांच्या घरी जाउन आपल्या आइ वडील व वयोवृद्ध नातेवाईकांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. नमाज पठणाच्या वेळी इदगाह वर ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वात पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. ता.प्र.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
कुशल प्रशासक पराक्रमी
वीरांगणा पुण्यश्लोक राजमाता
अहिल्यादेवी होळकर
(३१ मे १७२५-१३ ऑगस्ट १७९५)
यांना ३०१ व्या जयंतीदिनी कोटी कोटी वंदन!
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in
/MaharashtraDGIPR
/MahaDGIPR

# रिसोड शहरात भेसळीला आला उत

## अन्न व औषध प्रशासन मात्र निद्रिस्त; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

**रिसोड, ता. ३१ : शहरासह तालुक्यात भेसळीच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. विशेषतः दूध पनीर यासह दूधजन्य पदार्थांमध्ये सर्वाधिक भेसळ होत आहे. शहरात दररोज मोठ्या प्रमाणात दूध विक्रीत येत असले, तरी एवढे दुध नेमके येते तरी कोठून? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच पेढे, पनीर, तूप, श्रीखंड, आईस्क्रीम व दुग्धजन्य पदार्थांच्या सोबत फळांच्या मागणीत वाढ झाल्यामुळे या पदार्थांमध्येही मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याची चर्चा आहे. भेसळखोर नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असून, अन्न व औषधी प्रशासन मात्र निद्रिस्त की, हितसंबंध जोपासत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

ग्रामीण भागातून दुधाच्या उत्पादकतेत कमालीची घट झाली असली, तरीही शहरात थंडगार दुधाचा महापूर आहे. यंदा उन्हाळ्याची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याने शहरात थंड पेय, आईस्क्रीम, पेढा तसेच दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढली आहे. मात्र, या वाढत्या मागणीचा फायदा घेत अनेक विक्रेते भेसळयुक्त पदार्थांची विक्री करीत असल्याचा



आरोप नागरिकांकडून होत आहे. विशेषतः परराज्यातील व्यावसायिक चौका-चौकात दुग्धजन्य पदार्थांसह थंड पेयाची विक्री करत आहेत. स्वीट मार्ट व्यावसायिक आईस्क्रीम, पेढा, पनीर, मिठाई कधी बनविली व अंतिम मुदत याबद्दल कुठेही उल्लेख न करता खुलेआम विक्री करत आहेत. यामध्ये पदार्थात मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे दूध, कृत्रिम पद्धतीने रसायने पीकविलेली फळे, कालबाह्य साहित्य वापरून मिठाई व थंड पेय तयार केले जात असल्याची चर्चा आहे. अनेक ठिकाणी बनावट फ्लेवर, सॅकरीन, कृत्रिम सुगंध आणि दूषित पाण्याचा वापर होत असल्याचे सांगितले जात आहे. उन्हाळ्यात लहान मुले व युवक मोठ्या प्रमाणात

### कारवाई होणार की नाही?

**■ शहरात वर्षानुवर्षे भेसळयुक्त पदार्थ विकले जातात. दुग्धजन्य पदार्थात सर्वाधिक भेसळ होते. दही व ताकाची पाकिटे सर्वाधिक भेसळयुक्त आहेत. मात्र, भेसळखोरावर कोणाचाही अंकुश नसल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरूच आहे. या भेसळखोरावर कारवाई कधी होईल का असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

आईस्क्रीम आणि शीतपेयांचे सेवन करीत असल्याने आरोग्याचा धोका वाढला आहे. तरीही अन्न व औषध प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

शहरात अनेक खाद्यपदार्थ विक्रेते विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचेही बोलले जात आहे. मात्र, संबंधित विभागाकडून तपासणी मोहिमा राबवल्या जात नसल्याने भेसळखोरांचे फावले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व रुग्णावर अशा भेसळयुक्त पदार्थांचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केल्या जात आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने नियमित तपासणी मोहीम राबवून कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे. शहरातील आईस्क्रीम पार्लर, मिठाई दुकाने व थंड पेय विक्रेत्यांची तपासणी करून नमुने प्रयोगशाळेत पाठवावेत, दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना आळा घालावा, अशी मागणी केली जात आहे.

# आता पॉलिस्टर गणवेशातून विद्यार्थ्यांची मुक्तता

## आरामदायी गणवेश मिळणार; समग्र शिक्षा अभियानाचा दिसणार लोगो

**रिसोड, ता. ३१ : राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने समग्र शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेत सुधारणा केली असून, आता विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षापासून पॉलिस्टर, व्हिस्कोस आणि कॉटन अशा मिश्र कापडांचा गणवेश देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच त्या कपड्यावर समग्र शिक्षा अभियान असा लोगो देखील असणार आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण गणवेश मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.**

आता शासनाच्या नव्या निर्णयानुसार इयत्ता पहिली ते आठवीमधील पात्र विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जाणार. गणवेश खरेदी व वितरणाची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समिती मार्फत केली जाणार. गणवेशाचा रंग आणि रचना ठरवण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर शाळा



व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना शाळा सुरू होताच दोन गणवेश संच देण्याचे नियोजन आहे. निकृष्ट दर्जाच्या गणवेशावर कारवाई करण्यासाठी शिक्षण विभागाने कडक नियम लागू केले आहेत. शाळा समितीला आता गणवेश खरेदी करताना नियमांचे काटेकोर पालन करावे लागणार आहे. यामधे कापड खरेदी करताना किमान ७०:३० किंवा ८०:२० (पॉलिस्टर : व्हिस्कोस/कॉटन) या प्रमाणातील मिश्र कापड वापरणे अनिवार्य आहे. संपूर्ण पॉलिस्टर कापडामुळे विद्यार्थ्यांच्या त्वचेला ॲलर्जी किंवा इतर इजा होण्याची शक्यता असल्याने शासनाने त्यावर बंदी घातल्याने आता विद्यार्थ्यांना सुरक्षित गणवेश मिळणार आहे.

> समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना दर्जेदार, आरामदायी आणि आरोग्यदायी गणवेश उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. १00 टक्के पॉलिस्टर कापडाऐवजी आता अधिक हवा खेळती राहील आणि घामाचा त्रास कमी होईल, अशा कापडाला प्राधान्य देण्यात आले आहे. गणवेशाचा रंग व नमुना ठरविण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितींना देण्यात आले असून, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार गणवेश खरेदी व वितरण केले जाईल. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.
> - **संजय ससाणे**, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जि. प., वाशीम.

### स्काउट, गाइडसाठी आकर्षक पोशाख

**■ नव्या निर्णयामध्ये स्काउट आणि गाईडच्या विद्यार्थ्यांना विशेष गणवेश निश्चित करण्यात आला. यामध्ये मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची हाफ पॅट असणार आहे. मुलींसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळा स्कर्ट असलेला पिनो फ्रॉक, किंवा गडद निळी सलवार व आकाशी रंगाची कमीज (पंजाबी ड्रेस) असा पोशाख निश्चित करण्यात आला. या संदर्भातील शासन निर्णय आलेला आहे.**

# तहान भागविण्यासाठी वन्यप्राणी कृत्रिम पाणवठ्याच्या शोधात



पाणवट्यात नैसर्गिक पाणीसाठा नसल्यामुळे जंगलात वन्यप्राणी व वन्यजिव राहतात त्यांना जंगलात कुठेही पाणी नाही चारा

**रिसोड** : मार्च महिन्यापासुन उष्णतेचे तापमान दिवसे दिवस वाढत असल्याने पाण्याची पातळी खालावली आहे. नागरिकांना कामेधंदे सोडून पाणी आणावे लागत असल्याचे दिसून येत आहे. त्यातच एप्रिल महिन्यात उष्णता वाढल्याने जंगलातील ओढे व नाले कोरडे पडल्यामुळे जंगलात कठलाही नसल्यामुळे जंगले ओसाड पडले. वन्यप्राणी पाण्यासाठी गावाकडे धाव घेत असल्यामुळे वन्यप्राण्याची भिती नागरिकात आहे. वन्य प्राण्याची तहान भागविण्यासाठी जंगलात कृत्रिम पाणवटा तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. **(श.प्र.)**

# 33 वर्षांच्या ज्ञानसेवेनंतर सौ. कल्पना बानोरे यांचा शाळेतर्फे भावपूर्ण निरोप

### “शाळा म्हणजे माझे दुसरे घर” – सेवानिवृत्तीनंतर गहिवरल्या बानोरे

**रिसोड : भारत प्राथमिक मराठी शाळेच्या अंगणात 33 वर्षे अखंड ज्ञानदान करणाऱ्या सहाय्यक शिक्षिका सौ. कल्पना गजानन बानोरे यांचा शुक्रवारी शाळेच्या वतीने डोळे पाणावून टाकणारा निरोप समारंभ झाला. नियतवयोमानानुसार 30 मे रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या आणि शाळेच्या दारातून बाहेर पडताना विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत प्रत्येकाच्या मनात हुरहूर दाटून आली.**

शाळेच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ. किरणताई दुबे होत्या, तर सत्कारमूर्ती म्हणून सौ. कल्पना बानोरे आणि प्रमुख अतिथी म्हणून गजानन बानोरे उपस्थित होते.

सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. शिक्षिका पूजा लोंढे यांच्या सुमधुर स्वागतगीताने वातावरण भारावले. त्यानंतर मुख्याध्यापिका दुबे यांच्या हस्ते बानोरे दाम्पत्याचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात दुबे म्हणाल्या, “1993 साली कल्पनाताई शाळेत रुजू झाल्या आणि तेव्हापासून आजपर्यंत तब्बल 33 वर्षे त्यांनी शाळेला आपले कुटुंब मानले. वर्गातल्या पाटीपासून पालकांच्या अडचणीपर्यंत प्रत्येक प्रश्न त्यांनी आपुलकीने सोडवला. सहकाऱ्यांशी सौजन्य, विद्यार्थ्यांशी माया आणि कामाशी निष्ठा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू होते. अशा शिक्षिकेचा निरोप म्हणजे शाळेसाठी एक पोकळी आहे.”

सत्काराला उत्तर देताना सौ. बानोरे यांचा कंठ दाटून आला. त्या म्हणाल्या, “ही शाळा म्हणजे माझे दुसरे घरच होती. 33 वर्षांच्या प्रवासात मुख्याध्यापिका, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई देशमुख, अनंतरावजी देशमुख, ॲड. नकुलदादा देशमुख, अमृताताई देशमुख, चैतन्यभैय्या देशमुख या सर्वांचे मोलाचे सहकार्य आणि




मार्गदर्शन लाभले. त्यामुळेच मी माझी सेवा समाधानाने पूर्ण करू शकले. आज निरोप घेताना मन भरून येतेय, पण शाळेच्या आठवणी आयुष्यभर सोबत राहतील.”

यावेळी शिक्षिका जयश्रीताई दुबे, मोनिका भांदुर्गे, शिक्षक ए. बी. देशमुख, पंजाबराव देशमुख, गजानन बानोरे यांनीही बानोरे यांच्या कारकिर्दीचा आढावा घेत त्यांच्या शिस्त, वक्तशीरपणा व विद्यार्थीप्रिय स्वभावाच्या आठवणी जागवल्या.

कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षिका पूजा लोंढे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले, तर शिक्षक प्रवीण देशमुख यांनी आभार मानले. सेवानिवृत्तीनंतरही सौ. बानोरे सामाजिक व शैक्षणिक कार्यातून जोडल्या राहतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. एका समर्पित शिक्षिकेला निरोप देताना रिसोडच्या भारत प्राथमिक शाळेने आपल्या ‘माऊली’ला जड अंतःकरणाने निरोप दिला.

# राज्यसभा पोट निवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

मुंबई, दि.२३ : राज्यसभा सदस्य सुनेत्रा अजित पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. या जागेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, १ जून २०२६ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू होणार असून १८ जून २०२६ रोजी मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार ८ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ९ जून रोजी अर्जांची छाननी होईल, तर ११ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल.